2021-22 OVS

Peer reviewed Journal Impact Factor: 7.265 ISSN-2230-9578

# Journal of Research and Development

***A Multidisciplinary International Level Referred Journal***


*December-2021 Volume-12 Issue-20*








**Chief Editor**
Dr. R. V. Bhole
**Editor**
Dr. Mahadev Gavhane
Dr. Omprakash Shahapurkar
Dr. Suresh Phule
**Co-Editor**
Prof. Dattatray Sonkamble Dr. Vijay Dalvi Dr. Kishor Shinde



Address

| | | |
|---|---|---|
| 43 | हवामानातील बदल व भारतीय शेती<br>प्रा.डॉ.तोलमारे एस.एस. | 187-190 |
| 44 | महाराष्ट्रातील सामाजिक वनीकरण<br>डॉ. हरी साधू वाघमारे | 191-196 |
| 45 | कृषी रसायने आणि औद्योगिक भागातील रसायने व इतर रसायनांमुळे ठाणे जिल्ह्यातील खाडी प्रदेशाच्या जलगुणवत्तेवर होणारे परिणाम "<br>डॉ . सुरेश जे . फुले , श्री . नंदकुमार म . गोसावी | 197-201 |
| 46 | ठाणे जिल्ह्यातील कृषी रसायने आणि खतांच्या कारखान्यांमुळे होणाऱ्या हवा प्रदूषणाचा भौगोलिक अभ्यास"<br>डॉ. सुरेश जे. फुले, श्री. दिपक हि. महाजन | 202-209 |
| 47 | पन्हाळा तालुक्यातील बाल लिंग गुणोत्तराच्या स्थल कालीय बदलाचा अभ्यास १९९१-२०११<br>प्रा. अश्विनी खंडेराव मुरावणे, डॉ. ओमप्रकाश शहापूरकर , डॉ. अरुण पाटील | 210-230 |
| 48 | लातूर तालुक्यातील फळबाग शेती क्षेत्र : एक भौगोलिक विश्लेषण<br>शिंदे नरसिंग जयसिंग, डॉ.ओमप्रकाश व्ही. शहापूरकर | 231-234 |
| 49 | पन्हाळा तालुक्यातील सामाजिक व आर्थिक सोई सुविधा व प्रादेशिक विकास (२०११)<br>प्रा. अश्विनी खंडेराव मुरावणे, डॉ. ओमप्रकाश शहापूरकर, प्रा. संजयकुमार मेंन्शी | 235-243 |
| 50 | परळी तालुक्यातील मृदा संरचनेचा भौगोलिक अभ्यास<br>डॉ.व्ही.एस.चिमनगुंडे, कैलास भास्कर लव्हाळे | 244-246 |
| 51 | उस्मानाबाद जिल्ह्यातील सोयाबीन कृषी कार्यक्षमतेचा भौगोलिक अभ्यास (इ.स.1991 ते 2011)<br>प्रा.डॉ.शिरमाळे महेबुबपाशा बाबूमीयाँ | 247-252 |
| 52 | नंदूरबार जिल्हयातील लोकसंख्येचा भौगोलिक अभ्यास<br>प्रा.डॉ.राजेष्वर कोटलवार· प्रा.डॉ.बालाजी आव्हाड | 253-257 |
| 53 | तहसील सिकन्दपुर (जनपद बलिया) उत्तर प्रदेश में कृषि उद्योगो के विकास की सम्भावनायें<br>दुर्गेश राय- | 258-260 |
| 54 | अहमदपूर तालुक्यातील ग्रामीण वसाहतींची वाढ व वितरणाचा भौगोलिक अभ्यास<br>प्रा. डॉ. एन. के. वाघमारे श्री बी.ए. मोठेराव | 261-264 |
| 55 | चाकूर तालुक्यातील लिंग गुणोत्तराचे भौगोलिक विश्लेषण<br>प्रा. डॉ. के.बी. शिंदे बी. ए. मोठेराव | 265-267 |
| 56 | शेतीचा बदलता प्रवाह आणि त्याचा ग्रामीण विकासावर होणारा परिणाम<br>कसबे प्रार्थना गुलाबराव, प्रा.डॉ. बी. पी. गाडेकर | 268-272 |
| 57 | शेती विकासावर परिणाम करणा[illegible]्या घटकांचा अभ्यास<br>प्रा.डॉ. नामदेव संपतराव गोंड | 273-277 |
| 58 | बीड जिल्ह्यातील सामान्य भूमी उपयोजन कार्यक्षमता, एक भौगोलिक अभ्यास<br>डॉ. प्रकाश काशीनाथ मोरखंडे | 278-282 |

# लातूर तालुक्यातील फळबाग शेती क्षेत्र : एक भौगोलिक विश्लेषण

शिंदे नरसिंग जयसिंग[1] डॉ.ओमप्रकाश व्ही. शहापूरकर[2]
[1]एम. फिल. संशोधक विद्यार्थी भूगोल संशोधन केंद्र, राजर्षीशाहू महाविद्य(स्वायत्त) लातूर.
[2]भूगोल विभाग प्रमुख, भूगोल संशोधन केंद्रराजर्षीशाहू महाविद्यालय,(स्वायत्त) लातूर.

**शोधसारांश:**
प्रस्तुत शोध निबंधामध्ये लातूर तालुक्यातील फळबागपिक क्षेत्राचाअभ्यास करताना आंबा,डाळिंब,द्राक्षआणि बोर या चार फाळपिकांचा आढावा घेतला आहे . त्या मध्ये लातूर तालुक्यातील कृषी अधिकारी कार्यालयातील प्राप्त माहितीच्या आधारे वर्ष २००३ ते २००८ पासून २००८ ते २०१२ पर्यंतचा कालावधी निश्चित केला आहे. तसेच उद्देशाला अनुसरून निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने लातूर तालुक्यातील फळबाग शेती क्षेत्राचा विचार करता असे दिसून आले आहे कि आंबा या फळ पिकाचे क्षेत्र सर्वाधिक आहे तर त्या पाठोपाठ डाळिंब,त्यानंतर द्राक्ष व बोर या पिकाचे क्षेत्र आहे .
**बीज संज्ञा** : - कृषी क्षेत्र,फळबाग

## उद्दिष्टे

1) लातूर तालुक्यातील फळबागांचा अभ्यास
2) लातूर तालुक्यातील फळबाग क्षेत्राच्या वितरणाचा अभ्यास

## प्रस्तावना

कृषीचा विचार करता उत्पादन वाढीसाठी फळबाग शेतीला अनन्यसाधारण महत्व आहे. लातूर तालुक्यातील फळबाग क्षेत्राचा अभ्यास करताना काही मंडळांचा विचार व प्रत्येक फळाची विस्तृत माहिती आणि फळबागांच्या विकास याचा विस्तृत विचार केला गेला आहे. तसेच त्यासाठी लातूर तालुक्यातील फळबाग क्षेत्राखालील फळबागांचा अभ्यास केला आहे तसेच यातील प्रमुख फळबाग पिक क्षेत्र आंबा,बोर,आवळा,सीताफळ,द्राक्ष यांचा अभ्यास क्षेत्रात समावेश करण्यात आला आहे.

संशोधन पद्धती

विविध प्रकारच्या माहिती स्त्रोतांच्या आधारे मिळालेल्या आकडेवारीचे सांख्यिकीय पद्धतीने पृथक्करण करून त्याचे व्यवस्थित रीत्या विश्लेषण करण्यात आले आहे. यामध्ये द्वितीयक माहिती स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला आहे. ही माहिती जिल्हा जनगणना पुस्तिका जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन लातूर जिल्हा राजपत्र प्रकाशित व अप्रकाशित माहिती स्त्रोत नकाशे आणि शासकीय प्रकाशनानं मधून घेतलेली आहे तसेच शोधनिबंध तसेच पीएचडी अहवाल व मासिके, विविध सांख्यिकीय कार्यालय वर्तमानपत्रे इंटरनेट या माध्यमातून माहिती संकलित करण्यात आली आहे.

**अभ्यास क्षेत्र**

लातूर जिल्हा दहा तालुक्यांनी बनलेला असून त्यापैकी लातूर तालुका एक महत्त्वपूर्ण तालुका आहे. त्याचे कारण म्हणजे लातूर जिल्ह्याचे ठिकाण महत्त्वपूर्ण अशी बाजारपेठ आहे लातूर जिल्ह्याच्या पश्चिम भागात लातूर तालुका वसलेला आहे. याचा अक्षवृत्तीय व रेखावृत्तीय विस्तार 18 अंश 17 अंश ते 18 अंश 45 अंश उत्तर अक्षांश ते 76 अंश 12 अंश ते 76 अंश 45 अंश पूर्व रेखांश आहे लातूर तालुक्याचे क्षेत्रफळ 630 चौरस किलोमीटर असून क्षेत्रफळाच्या दृष्टीने जिल्हा तिसऱ्या क्रमांकाचा तालुका आहे तर लोकसंख्येच्या बाबतीत जिल्ह्यात प्रथम क्रमांक आहे लातूर तालुक्याच्या वायव्येस बीड जिल्हातील अंबाजोगाई तालुका उत्तरेस रेनापुर तालुका ईशान्य रेनापुर व चाकुर तालुका व पूर्वेस चाकुर व शिरूर आनंतपाळ तसेच अग्नेश शिरूर आनंतपाळ निलंगा व पश्चिम भागात उस्मानाबाद जिल्ह्याची सीमा आहे.


विषय विवेचन

तक्ता. क्र. १

| अ. क्र. | फळपीक | 2003-08 | 2008-12 | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | आंबा | 200.45 | 234.10 | 434.55 | 41.78 |
| 2 | डाळिंब | 9.30 | 25.40 | 34.7 | 3.27 |
| 3 | द्राक्ष | 24.80 | 31.75 | 76.55 | 5.43 |
| 4 | बोर | 258.75 | 255.80 | 514.55 | 49.45 |
| एकूण फळबाग खालील क्षेत्र | | 493.30 | 547.05 | 1040.45 | 100% |

स्रोत:तालुका कृषी अधिकारी

आलेख क्रं . १




आलेख क्रं . २




वरील फळबाग पीक व क्षेत्रांमध्ये सर्वाधिक क्षेत्र हे आंबा या फळपिकाचे वाढलेली दिसून येते. त्याच बरोबर त्यापाठोपाठ डाळिंब,द्राक्ष, बोर व  या पिकांचा क्रमांक लागतो. लातूर तालुक्यातील फळबाग क्षेत्राचा अभ्यास करताना असे आढळून आले की, फळबाग क्षेत्रांमध्ये काही प्रमाणात बदल झालेला आहे. त्यामध्ये आंबा यापिकाचे क्षेत्र २००३ ते २००८ च्या तुलनेत २००८ ते २०१२ या वर्षात 200.45 वरून वाढ होऊन 234.10 इतके झाले आहे तर डाळिंब या पिकाचे क्षेत्र २००३ ते २००८ च्या तुलनेत २००८ ते २०१२ या वर्षात 9.30 वरून वाढ होऊन 25.40 इतके झाले आहे तसेच द्राक्ष या पिकाचे क्षेत्र २००३ ते २००८ च्या तुलनेत २००८ ते २०१२ या वर्षात 24.80 वरून वाढ होऊन 31.75 इतके

झाले आहे. परंतु बोर या फळ पिकाचे क्षेत्र २००३ ते २००८ च्या तुलनेत २००८ ते २०१२ या वर्षात 258.75 वरून कमी होऊन ते 255.80 इतके झाले आहे.

## निष्कर्ष

लातूर तालुक्यातील फळबाग शेती क्षेत्राचा विचार करता असे दिसून आले आहे कि आंबा यापिकाचे क्षेत्र २००३ ते २००८ च्या तुलनेत २००८ ते २०१२ या वर्षात 200.45 वरून वाढ होऊन 234.10 इतके झाले आहे तर डाळिंब या पिकाचे क्षेत्र २००३ ते २००८ च्या तुलनेत २००८ ते २०१२ या वर्षात 9.30 वरून वाढ होऊन 25.40 इतके झाले आहे तसेच द्राक्ष या पिकाचे क्षेत्र २००३ ते २००८ च्या तुलनेत २००८ ते २०१२ या वर्षात 24.80 वरून वाढ होऊन 31.75 इतके झाले आहे. परंतु बोर या फळ पिकाचे क्षेत्र २००३ ते २००८ च्या तुलनेत २००८ ते २०१२ या वर्षात 258.75 वरून कमी होऊन ते 255.80 बोर फळ पिकाचे क्षेत्र अधिक असून त्याच्या इतके झाले आहे.

## शिफारशी

१) लातूर तालुक्यातील शेतकऱ्यांना फळबाग शेती विषयाचे महत्त्व समजावून सांगून त्या विषयीचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे

२) बोर फळपिकाखालील क्षेत्र वाढवणे

## संदर्भग्रंथ सूची :

1. नाडे योगेश्वरी रमेश,(२०१६) तुळजापूर तालुक्यातील फळबाग शेती:एक भोगोलिक विश्लेषण
2. भूगोल इयत्ता तिसरी (बालभारती २०२१) लातूर जिल्हा
3. सुरेश फुले,(२००२) कृषी भूगोल विद्याभारती प्रकाशन
4. लातूर तालुका कृषी अधिकारी फळबाग शेती अहवाल
5. जिल्हा अर्थ व सांखिकी कार्यालय लातूर
6. सामाजिक व आर्थिक समालोचन २००१ व २०११